

## मणिपाल हॉस्पिटलमध्ये 9 वर्षीय मुलीला जीवनदान


e Paper

# दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in | शनिवार दिनांक 22/11/२०२५ | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 6 || अंक 274 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# भारतीय लढाऊ विमानाचा अपघात!

## दुबई एअर शो 2025 मध्ये वैमानिकाचा दुर्दैवी मृत्यू

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**दुबई एअर शो २०२५ मध्ये शुक्रवारी धक्कादायक घटना घडली. हवाई प्रदर्शन सुरू असताना भारतीय बनावटीच्या तेजस या लढाऊ विमानाचा अपघात झाला. काही सेकंदात तेजस जमिनीवर कोसळले. यात वैमानिकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. दुबईच्या अल मकतूम आंतरराष्ट्रीय विमानतळावर ही घटना घडली.यामुळे प्रदर्शन पाहायला आलेल्या प्रेक्षकांमध्ये घबराट पसरली. भारतीय हवाई दलाने आता या घटनेची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.**



तेजस लढाऊ विमान हे भारतीय बनावटीचं आहे. अत्यंत हलक्या वजनाचं हे लढाऊ विमान आहे. जमिनीवरुन तसेच हवेतून हल्ला करण्यासाठी हे महत्त्वाचं लढाऊ विमान आहे. हे विमान राफेलसारखं ताकदवान आहे. असं असताना या विमानाचा अपघात झाल्याने अनेकांना धक्का बसला आहे. मानवी चुकीमुळे किंवा तांत्रिक बिघाडामुळे या विमानाचा अपघात झाल्याचा प्रथमदर्शनी अंदाज व्यक्त केला जातोय.

तेजस विमान हे डेमोंट्रेशन फ्लाईट दरम्यान कोसळलं. दुबईच्या स्थानिक वेळेनुसार दुपारी 2 वाजून 10 मिनिटांनी हे विमान कोसळल्याची माहिती आहे.

विमानाची कवायत पाहण्यासाठी हजारो प्रेक्षक जमले होते. पण कवायत करत असताना अचानक हे विमान जमिनीवर कोसळलं. यामुळे कार्यक्रम पाहणाऱ्या हजारो प्रेक्षकांनादेखील मोठा धक्का बसला.

# पिंपरी चिंचवड शहरात भाजपचा आज "शक्तिसंचय!"

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या निवडणुका जाहीर होण्यापूर्वीच भाजपने शहरात आक्रमक पवित्रा घेतला आहे. आगामी लढाईत पुन्हा स्वबळावर सत्ता मिळवण्याचा निर्धार करत आज (शनिवारी) सकाळी १० वाजता प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात भव्य कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला आहे.**



या मेळाव्यात शहरातील अनेक प्रभावशाली नेते आणि इतर पक्षांतून मोठ्या प्रमाणात होणारे प्रवेश यामुळे भाजप आपली राजकीय ताकद स्पष्टपणे दाखवण्याच्या तयारीत आहे.या मेळाव्याला प्रदेशाध्यक्ष रवींद्रदादा चव्हाण आणि प्रदेश सरचिटणीस राजेशजी पांडे हे विशेषतः मार्गदर्शन करणार असून, पिंपरी चिंचवड महापालिका पुन्हा जिंकण्यासाठीचा 'ब्लूप्रिंट' या ठिकाणी मांडला जाणार आहे. तसेच आ.महेश लांडगे,आ. शंकर जगताप,आ.उमा खापरे,आ.अमित गोरखे, माजी खासदार अमर साबळे, माजी आमदार अश्विनी जगताप आणि इतर वरिष्ठ नेते या मेळाव्यात एकत्रितपणे शहरातील वातावरण तापवण्याची भूमिका घेणार आहेत."आपापल्या टीमसह मोठ्या संख्येने या," असा स्पष्ट संदेश शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांनी दिला आहे.

येत्या काळातील प्रचाराचा सूर कसा असावा, विरोधकांना कशा पद्धतीने राजकीय उत्तर द्यायचे, कोणत्या रणनीतीने शहरात भाजपचे वर्चस्व प्रस्थापित करायचे—या सर्व मुद्द्यांवर उद्या रविंद्र चव्हाण थेट मार्गदर्शन करणार आहे.राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट आणि शिवसेनेच्या दोन गटांतून भाजपमध्ये प्रवेशाचे हालचाली सुरू असल्याने शहरातील राजकीय समीकरणे मोठ्या प्रमाणात बदलत आहेत.

"जिंकणाऱ्यांच्या बाजूला उभे राहावे" हा संदेश अनेकांना समजला असल्याने भाजपकडे येणाऱ्यांची संख्या वाढत आहे, असे सूत्रांकडून स्पष्ट होत आहे.अलीकडे ठाणे-कल्याण महापालिकेत शहरातील दिग्गजांना प्रवेश देत भाजपने मोठा राजकीय टप्पा साधला.

त्या धर्तीवरच पिंपरी चिंचवडमध्येही उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या समर्थकांना प्रवेश देऊन थेट आव्हान उभे करण्याची भाजपा तयार असल्याचे राजकीय चर्चेत वेगाने पसरत आहे.

या पार्श्वभूमीवर उद्याचा मेळावा केवळ औपचारिक कार्यक्रम नसून, पिंपरी चिंचवडमधील आगामी महापालिका निवडणुकीचा राजकीय बिगुल मानला जात आहे.भाजपचे शहरातील कार्यकर्ते, इच्छुक, पदाधिकारी यांच्यात प्रचंड उत्सुकता असून-"पुढील निवडणूक म्हणजे सत्ता पुनर्जिंकण्याची निर्णायक लढाई"-असा सूर पक्षात उमटत आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शनिवार दिनांक 22/11/2025

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# वाकड भागातील पाणीपुरवठा होणार सुरळीत

## 25 लाख लिटर क्षमतेच्या पाण्याच्या टाकीचे उद्घाटन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या वतीने वाकड परिसरातील कावेरीनगर येथे २५ लाख लिटर क्षमतेची पाण्याची उंच टाकी उभारण्यात आली आहे. या टाकीतून आजपासून पाणीपुरवठा देखील सुरू करण्यात आला आहे. या पाण्याच्या टाकीमुळे वाकड परिसरातील कस्पटेवस्ती, पिंक सिटी रस्ता परिसर, वेणूनगर, कावेरीनगर, पोलीस कॉलनी, दत्त मंदिर रस्ता आदी परिसरातील गृहसंकुले अशा विविध भागातील पाणीपुरवठा सुरळीत होईल, असे प्रतिपादन आमदार शंकर जगताप यांनी केले.**



कावेरीनगर,वाकड येथील वॉर्ड क्र. ५३, स. नं. २०८ मध्ये महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या वतीने ५ कोटी ८५ लाख रू.खर्च करून उभारण्यात आलेल्या २५ लाख लिटर्स क्षमतेच्या पाण्याची उंच टाकी व संपवेलचे उद्घाटन आमदार जगताप यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते.या कार्यक्रमास महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, स्थायी समितीच्या माजी सभापती ममता गायकवाड, माजी नगरसदस्य विनायक गायकवाड, संदीप कस्पटे, आरती चौंधे, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी, अनिल भालसाखळे, क्षेत्रीय अधिकारी आश्विनी भोसले, कार्यकारी अभियंता महेश बरिदे, महेश कावळे, हेमंत देसाई, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, उपअभियंता प्रविण धुमाळ, मनोज बोरसे, विश्वनाथ पाडवी,अमरजित म्हस्के,सामाजिक कार्यकर्ते सचिन साठे,ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष अनिल देशमुख,अध्यक्षा वृषालीताई मरळ, ग्लेग इंजिनिअर्सचे मोहनलाल शर्मा, यांच्यासह ज्येष्ठ नागरिक,विविध सामाजिक क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्ते महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी व नागरिक यावेळी उपस्थित होते.पिंपरी चिंचवड महापालिकेने कावेरीनगर परिसरात उभारण्यात आलेल्या पाण्याच्या टाकीचे काम उच्च दर्जाचे केले आहे.

शहरातील नागरिकांना चांगले रस्ते, मुबलक पाणी, आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका नेहमीच प्रयत्नशील असते. स्वच्छतेच्या बाबतीत आपल्या पिंपरी चिंचवड शहराचा देशात नावलौकिक आहे.

आपल्या शहराचा झपाट्याने विकास होत असून शहराची लोकसंख्या देखील जवळपास ३५ लाखांपर्यंत गेली आहे.

वाढत्या लोकसंख्येचा विचार करून येणाऱ्या काळात शहरातील सर्व नागरिकांना मुबलक पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका प्रयत्नशील असून त्यांना राज्य सरकारकडून आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी सहकार्य केले जाईल, असे आमदार शंकर जगताप बोलताना म्हणाले.

# महापालिकेची कडक दंडात्मक कारवाई

## फ क्षेत्रीय कार्यालयाची धडक मोहीम 17 दिवसांत 1.60 लाखांची दंड वसुली

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी चिंचवड महापालिकेने सार्वजनिक स्वच्छतेविषयक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करण्याची मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत 'फ' क्षेत्रीय कार्यालयाने १ नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत विविध नियमभंग करणाऱ्यांकडून एकूण १ लाख ६० हजार ७०० रुपये इतका दंड वसूल केला आहे.**




पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल व आरोग्य कार्यकारी अधिकारी तथा सहा.आयुक्त अमित पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच 'फ' क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील यांच्या अधिपत्याखाली ही कारवाई राबवण्यात आली.शहर अधिक स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी करण्याच्या दिशेने महापालिका सातत्याने प्रयत्नशील आहे. नागरिकांनी कचरा विलगीकरणाबाबत जागरूक राहावे यासाठी क्षेत्रीय कार्यालयांमार्फत जनजागृती उपक्रम मोठ्या प्रमाणावर चालू आहेत. 'फ' क्षेत्रीय कार्यालयाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील यांनी नियमभंगाविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले होते.त्यानुसार उघड्यावर कचरा टाकणे, प्लास्टिकचा वापर, कचरा वर्गीकरण न करणे, दुकानदारांकडे दोन डस्टबिन न ठेवणे, सार्वजनिक ठिकाणी राडारोडा टाकणे अशा नियमभंगांवर कारवाई करून दंड वसूल करण्यात आला.या धडक कारवाई मोहिमेत सहा. आरोग्य अधिकारी महेश आढाव, मुख्य आरोग्य निरीक्षक कांचनकुमार इंदलकर, आरोग्य निरीक्षक गौरव दराडे, महेंद्र साबळे, समाधान कातड, रामचंद्र शिंगाडे यांनी सक्रिय सहभाग घेतला.

**'फ' क्षेत्रीय कार्यालयाची दंडात्मक कारवाई**

(कालावधी : १ नोव्हेंबर २०२५ ते १७ नोव्हेंबर २०२५)

बंदी असलेल्या प्लास्टिकचा वापर – ८५ हजार रुपये

कचरा वर्गीकरण न करणे – १२ हजार ७०० रुपये

उघड्यावर कचरा टाकणे – ३४ हजार रुपये

दुकानांमध्ये दोन डस्टबिन न ठेवणे – २६ हजार रुपये

सार्वजनिक ठिकाणी राडारोडा टाकणे – ३ हजार रुपये

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
शनिवार दिनांक 22/11/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# पिंपरी चिंचवड महापालिकेकडून 32 घरकुलांसाठी सोडत

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने दिलेल्या घरकुलातील सदनिकांच्या लाभामुळे लाभार्थ्यांचे स्वतःच्या घराचे स्वप्न साकार झाले असून, त्याचा वापर योग्य करावा, सदनिका भाड्याने देऊ नयेत व परिसर स्वच्छ ठेवावा, असे आवाहन झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाचे उपायुक्त अण्णा बोदडे यांनी केले.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, केंद्र शासन व महाराष्ट्र शासन यांच्या सहकार्याने चिखली सेक्टर क्र. १७ व १९ येथे जवाहरलाल नेहरू नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन अंतर्गत आर्थिक दुर्बल घटकांसाठी उभारण्यात आलेल्या प्रकल्पातील रिक्त ३२ सदनिकांसाठीची संगणकीय सोडत आज चिंचवड येथे झाली. यावेळी ते बोलत होते.यावेळी कार्यकारी अभियंता राजेंद्र शिंदे, उपअभियंता सुनील दांगडे, माहिती व तंत्रज्ञान अधिकारी उज्वला गोडसे, मुख्य लिपिक सुनील माने, दिलीप वाघमोडे, योगिता जाधव, कुणाल डोळस, सूरज लखन, मंगेश पजई यांच्यासह विभागातील अधिकारी, कर्मचारी व लाभार्थी उपस्थित होते. सर्व लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर घरकुल मिळाल्याचा आनंद दिसून येत होता.महापालिका प्रशासनाने पुनर्वसन कार्यात गती आणत अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या कुटुंबांचे स्वप्न प्रत्यक्षात उतरवले आहे.

या प्रकल्पामध्ये १५८ इमारती उभारण्यात आल्या असून प्रत्येक इमारतीत ४२ सदनिका आहेत.

आतापर्यंत ६ हजार ६३६ पैकी ६ हजार ६०२ सदनिकांचे वितरण पूर्ण झाले आहे. सदर प्रकल्पातील विविध इमारतींमध्ये रिक्त असलेल्या सदनिकांची संगणकीय सोडत आज संपन्न झाली.

सदर प्रकल्पातील सदनिकांच्या वाटपाची प्रक्रिया पूर्ण होत आहे.

# उर्दू माध्यमिक विद्यालय येथे बाल हक्क दिवस साजरा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**रूपीनगर : उर्दू माध्यमिक विद्यालय, रूपीनगर येथे दिनांक २० नोव्हेंबर २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय बाल हक्क दिवसानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास Hope for the Children Foundation तसेच पिंपरी चिंचवड पोलिस विभागाचे अधिकारी मान्यवर उपस्थित होते.**




सकाळी १० वाजता सुरु झालेल्या या कार्यक्रमामध्ये फाउंडेशनचे ॲड. परम आनंद सर यांनी विद्यार्थ्यांना बाल हक्क आणि बालकांचे मूलभूत अधिकार याबाबत मार्गदर्शन केले.

तसेच पिं. चिं. पोलीस अधिकारी वैशाली खेडकर व प्रथमा पाटील यांनी "गुड टच-बॅड टच" या महत्त्वपूर्ण विषयावर जागरूकता निर्माण केली. यावेळी पिं. चिं. पोलीस आयुक्तालयातील श्रीमती अश्विनी शिंदे व श्री. भूषण लोहारे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक श्री. आर.पी. कोंढावळे, शिक्षक श्री. अशफाक अफसर शेख, श्री. मो. आतिफ फैसल, श्रीमती ताहेरा शेख तसेच विद्यार्थी सुरक्षा व भौतिक विकास समितीचे सदस्य उपस्थित होते.

या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये बाल हक्क आणि सुरक्षिततेबाबत जनजागृती निर्माण करण्यात आली.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शनिवार दिनांक 22/11/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# मणिपाल हॉस्पिटलमध्ये 9 वर्षीय मुलीला जीवनदान

## 69 वर्षीय आजीकडून किडनी दान

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे, १९ नोव्हेंबर २०२५ : पुण्यातील खराडी येथील मणिपाल हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी अंतिम टप्प्यातील किडनी आजाराने पीडित असलेल्या ९ वर्षीय मुलीवर जिवंत दात्याचे किडनी प्रत्यारोपण यशस्वीरित्या केले आहे. या दुर्मिळ व यशस्वी केसमध्ये या मुलीला तिच्या ६९ वर्षीय आजीकडून किडनी मिळाली, ज्यामधून दिसून येते की, मुलांमध्ये प्रत्यारोपण करताना वय आणि कौटुंबिक नात्याचा विचार केला जाऊ शकतो.**



९ वर्षीय सक्रिय व हुशार मुलीला सौम्य स्वरूपाचा ताप, अशक्तपणा व खोकला या तक्रारींसह हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. बालरोगतज्ञांकडून पुढील उपचार व चाचणीमधून फक्त ३ g/dl ची अत्यंत कमी हिमोग्लोबिन पातळी असल्याचे निदर्शनास आले. पुढील तपासण्यांमधून किडनी कार्यावर गंभीर परिणामाची पुष्टी झाली आणि इमेजिंगमधून दिसून आले की दोन्ही किडन्या अत्यंत लहान होत्या आणि आकुंचन पावल्या होत्या. यामधून गंभीर किडनीच्या आजाराचे निदान झाले, ज्याकडे मूत्रमार्गात लक्षणे दिसून न आल्याने दुर्लक्ष झाले होते.

हे निदान कुटुंबासाठी धक्कादायक ठरले, त्यांची लहान मुलगी किडनी फेल्युअरचा सामना करत असल्याचे सत्य स्वीकारणे त्यांना अवघड झाले. किडनी प्रत्यारोपणाच्या गरजेने त्यांच्या दु:खामध्ये अधिक भर केली. या आव्हानात्मक काळामध्ये या लहान मुलीने उल्लेखनीय धाडस दाखवले, तिच्या ६९ वर्षीय आजीने स्वत:ची किडनी दान करण्याचा निर्णय घेत अधिक मोठे धैर्य दाखवले. या केसमधून कुटुंबामध्ये प्रेम व आशेची क्षमता दिसून आली.

या केसबाबत मत व्यक्त मणिपाल हॉस्पिटल खराडीमधील नेफ्रोलॉजी व किडनी ट्रान्सप्लाण्टचे कन्सल्टण्ट डॉ. मनिषकुमार माळी म्हणाले, "दाता आणि रुग्ण यांच्यातील वयान्तर खूप जास्त असल्यामुळे परिस्थिती आव्हानात्मक होती. मुलीला दीर्घकालीन आणि न ओळखल्या गेलेल्या आजारामुळे मूत्रपिंड निकामी झाले होते आणि तिचे प्राण वाचवण्यासाठी तसेच पुढील आयुष्याची गुणवत्ता चांगली राहण्यासाठी किडनी प्रत्यारोपण हाच सर्वोत्तम पर्याय होता. रुग्णाच्या आजीने दाता होण्यासाठी स्वेच्छेने पुढे येत प्री-ट्रान्सप्लान्ट तपासणीचा एक भाग म्हणून सुसंगतता चाचण्या केल्या. वय जास्त असूनही हृदय, मूत्रपिंड आणि सर्वसाधारण आरोग्याच्या सखोल तपासणीनंतर त्या वैद्यकीयदृष्ट्या तंदुरुस्त असल्याचे आढळले. हे प्रकरण अत्यंत दुर्मीळ आणि कठीण होते—कारण यात फक्त १४ किलो वजनाची, उच्च रक्तदाब असलेली नऊ वर्षांची मुलगी होती. संपूर्ण प्री-ॲनेस्थेटिक मूल्यमापनानंतर सामान्य भूल देऊन प्रत्यारोपण करण्यात आले. शस्त्रक्रियेनंतर दाता आणि रुग्ण दोघांचीही काटेकोरपणे निगराणी ठेवण्यात आली आणि आवश्यक ती सर्व पोस्ट-ट्रान्सप्लान्ट काळजी देण्यात आली.

"सर्जरीबद्दल बोलताना डॉ. आनंद धारस्कर, सल्लागार - युरोलॉजी, मणिपाल हॉस्पिटल खराडी म्हणाले , " मुलांमध्ये किडनी प्रत्यारोपण करणे नेहमीच गुंतागुंतीचे असते, विशेषतः जेव्हा प्राप्तकर्ता नऊ वर्षांचा असतो, ज्याच्या शिरा बारीक आणि शारीरिक वजन कमी असते. प्रौढ व्यक्तीची किडनी साधारण ११ सें.मी.ची असते, त्यामुळे ती लहान पोटात सुरक्षित ठेवण्यासाठी बदल केलेले चिरा घेणे आणि अतिशय अचूक रक्तवाहिन्यांचे टाके घेणे आवश्यक असते. या प्रकरणात संपूर्ण प्रक्रिया अत्यंत बारकाईने आखण्यात आली आणि समर्पित तसेच कार्यक्षम टीमवर्कच्या मदतीने निर्विघ्नपणे पार पडली. लॅप्रोस्कोपिक पद्धतीने किडनी काढल्यामुळे वेदना कमी होतात, शस्त्रक्रियेतील ताण कमी होतो आणि रुग्णाचा बरा होण्याचा कालावधीही जलद होत जातो. लॅप्रोस्कोपिक डोनर नेफ्रेक्टॉमीमुळे या प्रक्रियेमध्ये मोठा बदल झाला असून, जेष्ठ दात्यांनाही लवकर चालण्यास आणि त्यांच्या दैनंदिन कार्याकडे जलद परतण्यास मदत होते.

"दाता म्हणून आपला अनुभव सांगताना आजी म्हणाल्या, " मी माझं आयुष्य जगले आहे, पण माझ्या नातीचं आयुष्य तर आता सुरू होत आहे. ती पुन्हा आजारी पडू लागली, श्वास घेण्यास त्रास होऊ लागला आणि चालायलाही शक्ती उरली नाही, हे पाहून मन सहन होत नव्हतं.

डॉक्टरांनी तिची किडनी निकामी झाल्याचं सांगितलं तेव्हा माझ्या मनात क्षणभरही शंका नव्हती—तिला वाचवण्यासाठी माझी किडनी द्यायचीच. ती फक्त नऊ वर्षांची आहे, पण प्रत्येक चाचणी, प्रत्येक आव्हान तिने तिच्या वयापेक्षा कितीतरी जास्त धैर्याने पेललं. डॉ. माळी आणि संपूर्ण टीमकडून आम्हाला मिळालेला आधार व विश्वास आमच्यासाठी खूप शक्तिदायक ठरला. आज तिच्या चेहऱ्यावरचं हसू आणि तिचं बरं होत जाणं पाहून मला स्वतःलाच नवं आयुष्य मिळाल्यासारखं वाटतंय. आजी म्हणून तिला दुसरी संधी देणं—यापेक्षा मोठं वरदान देव मला देऊच शकला नसता."

पुण्यातील मणिपाल हॉस्पिटल खराडीचे हॉस्पिटल डायरेक्टर श्री. परमेश्वर दास म्हणाले , " शस्त्रक्रियेनंतर दाता आजी व मुलीवर काळजीपूर्वक लक्ष ठेवण्यात आले, जेथे प्रत्यारोपणानंतरची काळजी, संसर्गावर नियंत्रण, रोगप्रतिकारशक्ती वाढवणारे उपचार आणि नियमित किडनी कार्यावर देखरेख करण्यात आली. तिसऱ्या दिवशी दाता आजीला डिस्चार्ज देण्यात आला, तर मुलीला किडनी कार्यामध्ये चांगली सुधारणा दिसून आल्यावर आठव्या दिवशी डिस्चार्ज देण्यात आला. या केसमधून दिसून येते की वय कितीही असो प्रत्येक रूग्णाला मणिपाल हॉस्पिटल्समध्ये उत्तम उपचार मिळतात, जेथे आमची टीम अत्याधुनिक प्रत्यारोपण केअर देण्याप्रती समर्पित आहे. शस्त्रक्रियेनंतर आयसोलेशनमध्ये पालकांशिवाय राहणाऱ्या त्या लहान रुग्णासाठी टीमने विशेष मानसशास्त्रीय सहाय्याचीही व्यवस्था केली, ज्यामुळे उपचारांच्या काळात तिची भावनिक स्थिरता, शांतता आणि सहकार्य कायम राहिले ."ही शस्त्रक्रिया मणिपाल हॉस्पिटल खराडी येथील बहुविद्याशाखीय तज्ज्ञांच्या टीमने पूर्ण केली.

या टीममध्ये डॉ. मनीषकुमार माळी (सल्लागार – नेफ्रॉलॉजी), डॉ. आनंद धारस्कर (सल्लागार – यूरोलॉजी), डॉ. अंकित शर्मा (सल्लागार – यूरोलॉजी) आणि डॉ. सुनील बोरडे (सल्लागार – ॲनेस्थेसियोलॉजी) यांचा समावेश होता. तज्ज्ञांच्या या समन्वयामुळे संपूर्ण शस्त्रक्रिया प्रक्रियेदरम्यान रुग्णांची स्थिती स्थिर आणि सुरक्षित राहिली. उत्कृष्ट टीमवर्क आणि वैद्यकीय कौशल्यामुळे शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली आणि दाता व प्राप्तकर्ता दोघांचीही रिकव्हरी अधिक जलद झाली.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
शनिवार दिनांक 22/11/2025
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# कोयंबतूर महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून पिंपरी महापालिकेची प्रशंसा!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : शहरी स्थानिक संस्था (युएलबी) यांची कार्यक्षमता वाढविणे, संस्थात्मक शिक्षणाला चालना देणे आणि अत्याधुनिक प्रकल्पांची प्रत्यक्ष पाहणी करून प्रशासनिक अनुभव समृद्ध करण्याच्या उद्देशाने नुकतेच पिंपरी चिंचवड महापालिकेला कोयंबतूर महापालिकेच्या प्रतिनिधींनी भेट दिली.**



या भेटीद्वारे अधिकाऱ्यांनी वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्प, घनकचरा व्यवस्थापन, वापरलेल्या पाण्याचे व्यवस्थापन आणि स्वच्छता व्यवस्थापनातील 'ऑपरेशन अँड मेंटेनन्स' कामकाजाचे व्यापक निरीक्षण केले.कोयंबतूर महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त अनामिका रमेश (भा.प्र.से.), मुख्य अभियंता थिरू विजयकुमार यांच्यासह सदर अभ्यासदौऱ्यात कोयंबतूर महापालिकेच्या विविध विभागांच्या अधिकाऱ्यांचा समावेश होता. या भेटीदरम्यान पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अत्याधुनिक वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पाच्या स्थळावर पाहणी करण्यात आली. या प्रकल्पात कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती, संकलन ते विल्हेवाट प्रक्रियेतील यंत्रणा, तसेच पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर कसा केला जातो, याचे सविस्तर सादरीकरण करण्यात आले. पिंपरी चिंचवड महापालिकेचे कनिष्ठ अभियंता दशरथ वाघोले तसेच वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्प सल्लागार प्रतिनिधी स्वरूप लागारे यांनी सदर प्रकल्पाबाबत कोयंबतूर महापालिकेच्या प्रतिनिधींना माहिती दिली.

वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पाचे केलेले व्यवस्थापन, स्वच्छता आणि तांत्रिक अंमलबजावणी पाहून विशेषतः कोयंबतूर महापालिकेच्या प्रतिनिधींनी समाधान व्यक्त केले. प्रकल्पातील प्रत्येक प्रक्रिया अत्यंत नियोजनबद्ध व व्यवस्थितपणे राबविण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले. उपस्थित अधिकाऱ्यांनी दिलेले सविस्तर मार्गदर्शन, तांत्रिक माहितीची स्पष्ट मांडणी आणि संपूर्ण प्रकल्पाबाबत दाखवलेली पारदर्शकता यांचेही त्यांनी कौतुक केले.

या भेटीमुळे महापालिकेच्या कार्यक्षमता, समन्वय आणि प्रगत शहरी व्यवस्थापनाचा उत्कृष्ट अनुभव मिळाल्याचे प्रतिनिधींनी सांगितले. पाहणीदरम्यान प्रशासकीय आणि तांत्रिक अनुभवांची देवाणघेवाण करण्यात आली. तसेच दोन्ही महापालिकांदरम्यान भविष्यातील सहकार्याच्या नव्या मार्गांना यामुळे चालना मिळाली आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेमार्फत राबविण्यात येणारे कचरा व्यवस्थापन, पर्यावरणपूरक उपक्रम आणि वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्प हे शाश्वत शहरी विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरत आहेत. कोयंबतूर महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केलेली समाधानकारक प्रतिक्रिया आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. अशा देवाणघेवाणीमुळे तांत्रिक प्रगतीला गती मिळते आणि उत्तम प्रशासनासाठी नव्या संधी निर्माण होतात.

**विजयकुमार खोराटे,**
अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

पिंपरी चिंचवड महापालिका शहरातील कचरा व्यवस्थापनाला वैज्ञानिक दृष्टिकोनातून हाताळत आहे. वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पामुळे शहरातील कचरा विल्हेवाटीची समस्या मोठ्या प्रमाणात कमी झाली असून स्वच्छ ऊर्जा निर्मितीला चालना मिळत आहे. आजच्या पाहणीमुळे आमच्या कामाची दिशा इतर महापालिकांसाठी आदर्श ठरत असल्याचे अधोरेखित झाले आहे.

**संजय कुलकर्णी**
मुख्य अभियंता, पिंपरी चिंचवड महापालिका

# सिमेंट मिक्सर वाहनाच्या धडकेत तरुणीचा मृत्यू

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत






पिंपरी-चिंचवड: हिंजवडीत अपघातांची मालिका थांबण्याचे नाव घेत नाही. मारुंजी रस्त्यावर सिमेंट मिक्सरखाली चिरडून एका महाविद्यालयीन तरुणीचा मृत्यू झाल्याची घटना दुपारी पावणे दोनच्या सुमारास घडली.गेल्या काही महिन्यांपासून हिंजवडी परिसरात डंपर आणि सिमेंट मिक्सरच्या धडकेत तरुणींच्या मृत्यूच्या घटना सातत्याने वाढताना दिसत आहेत. आजच्या अपघातात रिदा खान हिचा मृत्यू झाला असून तिचा मित्र गंभीर जखमी झाला आहे.रिदा खान ही मित्रांसोबत कासारसाई धरण परिसरात फिरून परत येत होती. दुचाकीवरून परत येत असताना शिंदे वस्ती येथे उतारावर भरधाव वेगाने येणाऱ्या सिमेंट मिक्सरने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. धडकेनंतर दोघे रस्त्यावर पडले. त्यापैकी रिदा थेट सिमेंट मिक्सरच्या चाकाखाली आल्याने तिचा जागीच मृत्यू झाला, तर तिचा मित्र जखमी झाला आहे.या घटनेनंतर हिंजवडी आणि परिसरातील डंपर-सिमेंट मिक्सरमुळे होणाऱ्या अपघातांचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. संबंधित सिमेंट मिक्सरच्या चालकाचा शोध हिंजवडी पोलीस घेत आहेत.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968




अधिक माहिती साठी संपर्क : 7218327321 / 7620889734